महा मेट्रो

NAGPUR METRO

महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड

(नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

# परियोजना लोकाभिमुख असावी हेच महा मेट्रोचे लक्ष्य: डॉ. दीक्षित

## सातव्या स्थापना दिन समारोहात डॉ. बृजेश दीक्षित यांचे प्रतिपादन



**नागपूर** : आगामी काळात शहराच्या चारी दिशेत मेट्रो ट्रेनच्या माध्यमाने प्रवासी सेवा सुरु होणार आहे. या प्रकल्पाची उभारणी करणे अतिशय आव्हानात्मक होते. पण याही पेक्षा मोठे भावनात्मक आव्हान म्हणजे लोकांना या प्रकल्पाशी जोडणे हे होते जे आम्ही पूर्ण करतो आहे. जितक्या मोठ्या संख्येने नागरिक मेट्रो सेवेचा उपयोग करत आहेत तितकेच आम्ही आमच्या ध्येयाच्या अधिक जवळ जात असल्याचे मत महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ ब्रिजेश दीक्षित यांनी व्यक्त केले. डॉ दीक्षित महा मेट्रो नागपूरच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात उपस्थितांना संबोधित करत होते.

महा मेट्रोने ६०,००० प्रवासी संख्येचा आकडा पार केला आहे. रिच-२ आणि रिच-४ दरम्यान प्रवासी सेवा सुरु झाल्यावर हा आकडा १ लाखाच्या जवळ पोहचेल. आणि त्या पुढला टप्पा म्हणजे ३ लाख प्रवासी रोज मेट्रोने प्रवास करतील. या सारखा प्रकल्प पूर्ण करणे सोपे नव्हते, निर्धारित वेळेत गुणवत्ता पाळत टीम वर्कच्या साहायाने पूर्ण ते केले जात आहे. महा मेट्रोच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त नागपूरवासी अभिनंदनाचे पात्र आहेत. कारण त्यांनी अनेक समस्यांना सहन करत प्रत्येक वेळी महा मेट्रोची साथ दिली. अतिशय नियोजन पूरक काम केल्या बद्दल महा मेट्रो टीम सोबतच त्यांचे परिवारजन देखील कौतुकास पात्र आहेत.

कार्यक्रमात उपस्थित प्रमुख अतिथि आणि वक्त्यांनी सुचवलेलया उपायांवर तातडीने अंमलबजावणी करण्याचा उल्लेख करत डॉ दीक्षित यांनी कार्यक्रमातील अतिथींना मेट्रोचे ब्रँड अँबॅसेडर असळण्याचा मान दिला.



या समारोहात मनपा आयुक्त श्री राधाकृष्णन बी., उद्योगपती श्री. विलास काळे, आर्कीटेक्ट श्री. अशोक मोखा, हृदय रोग तज्ज्ञ डॉ. प्रशांत जगताप, वरिष्ठ पत्रकार सरिता कौशिक, वेद काउन्सिलचे अध्यक्ष श्री. शिवकुमार राव, टॅक्स पेयर्स असोसिएशनचे सचिव श्री. तेजिंदर सिंग रेणु, निरीचे  पूर्व संचालक श्री. सतीश वटे - यांनी नागपूर मेट्रोच्या वर्धापन दिनानिमित्त मेट्रोशी त्यांचे जुळलेले जिव्हाळ्याचे नाते यावर मनोगत व्यक्त केले.

**महा मेट्रोचा प्रवास:**

**पर्यावरणाचा योग्य तो समतोल पाळण्याकरता सार्वजनिक परिवहन व्यवस्थेचा उपयोग आवश्यक आहे - मनपा आयुक्त श्री राधाकृष्णन बी**

नागपूर महाराष्ट्रातील चौथ्या क्रमांकाचे विकसित शहर आहे, पण मेट्रोच्या बाबतीत ते अव्वल क्रमांकाचे शहर ठरले आहे हि गौरवाची बाब असल्याचे मनपा आयुक्त श्री राधाकृष्णन बी म्हणाले. नागरीकानीं खासगी वाहनांचा उपयोग करण्याऐवजी मेट्रोचा उपयोग करावा ज्याने पर्यावरणाच्या संरक्षणासोबतच  आरोग्याची सुरक्षा देखील होऊ शकते, असेही ते म्हणाले. वाहनांमुळे प्रदूषण सतत वाढत असल्याने, शहराचे आरोग्य नीट-नेटके ठेवणे हे देखील प्रत्येक नागरिकाचं कर्तव्य असल्याचे देखील आयुक्त म्हणाले.

· **नागपूरचे स्वरूप बदलले आहे : श्री विलास काळे**

नामवंत उद्योगपती श्री. विलास काळे यांनी मेट्रोच्या या एकूण प्रवासाची स्तुती केली. ७ वर्षाच्या प्रकल्प उभारणीच्या काळात नागपूरचे स्वरूपच बदलले. व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीक्षित यांच्या नेतृत्वाला धन्यवाद देत ते म्हणाले कि आधी नागपूरची ओळख संत्री, कापूस अशीच होती पण आता आंतरराष्ट्रीय मेट्रोच्या नावाने शहराची ओळख होते आहे. यामुळे सर्व सामान्यांचे लाईफस्टाईल देखील बदलत असल्याचे ते म्हणाले.

· **मेट्रो प्रकल्पामुळे सर्वांगीण विकास : आर्किटेकट श्री. अशोक मोखा**

नागपूर मेट्रो प्रकल्पामुळे शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळाली आहे. जागतिक दर्जाची वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबरच शहराचे स्वरूप बदलण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सार्वजनिक समस्यांशी निगडीत समस्या कायमस्वरूपी सोडवण्याबरोबरच मेट्रोने प्रेक्षणीय स्थळांचे रूपांतरही नव्या स्वरूपात केले आहे. मेट्रोच्या कामाबाबत निष्ठा व्यक्त करताना जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालय अशी अनेक कार्यालये जुनी असल्याने त्यांनाही मेट्रोचे प्रतिनिधीत्व मिळाल्यास त्यांचे स्वरूपही बदलेल.

**नागरिक मेट्रोशी भावनिक जुळलेले आहेत : सरिता कौशिक**

ज्येष्ठ पत्रकार सरिता कौशिक यांनी स्थापना दिनाच्या शुभेच्छा दिल्या, मेट्रोशी लोकांचे नुसते प्रवासापुरते नाते नसून मेट्रोच्या अगदी छोट्या छोट्या गोष्टी सुद्धा त्यांना त्यांच्या वाटतात. या  ७ वर्षांच्या प्रवासात नागरिक मेट्रोशी भावनिक जोडले गेले आहेत आणि त्यांना ही खरंच माझी मेट्रो वाटते हे विशेष. मेट्रोबद्दलच्या जनभावनेचा आदर करत सरिता कौशिक यांनी 'बेटर दॅन ड्रीम'    हे पुस्तक लिहिले आहे, ज्यात मांडलेले लेख लोकभावनेने परिपूर्ण आहेत, असे त्यांनी नमूद केले.



**मेट्रोच्या प्रवासाने विकासाची पावले वाढत आहेत : श्री. शिवकुमार राव**

वेद परिषदेचे अध्यक्ष श्री. कुठे शिवकुमार राव म्हणाले, मेट्रोच्या 7 वर्षांच्या प्रवासात टप्प्याटप्प्याने विकास होताना दिसतोय! मेट्रोने शहराची सार्वजनिक परिवहनाच्या सर्वात मोठी गरज पूर्ण केली! 2022 मध्ये, महामेट्रोने नागपूरला अभिमानास्पद शहर श्रेणीत नेले आहे! सन 2008 मध्ये मिहानच्या सुरुवातीच्या वेळी वाहतूक व्यवस्था कशी असेल, असा जटील प्रश्न निर्माण झाला होता! मात्र महा मेट्रोने हे समाधानही दर्जेदार पद्धतीने, ठरलेल्या कालावधीत पूर्ण केले आहे.

· **मेट्रोसह सर्वांचा विकास : तेजिंदर सिंग रेणू**

टॅक्स पेअर्स असोसिएशनचे सचिव श्री. तेजिंदरसिंग रेणू म्हणाले की, सर्वच स्तरातील लोकांना मेट्रोमुळे लाभ मिळत आहे, हे वास्तव आहे.  मेट्रो प्रकल्पाच्या सुरुवातीचा विरोध मावळून सर्वत्र नागरिकांचे सहकार्य मेट्रोच्या बाजूने असल्याचे ते म्हणाले.  मेट्रोकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक! कारण, हा प्रकल्प नागपूरला नव्या उंचीवर नेणारा आहे. मुले आणि महिलांसाठी सर्वात सुरक्षित आणि आरामदायी प्रवास.

· **मला अभिमान आहे की माझ्या शहरातही मेट्रो आहे : श्री. सतीश वटे**

निरीचे माजी संचालक श्री. सतीश वटे म्हणाले, माझ्या शहरातही मेट्रो धावतेय याचा मोठा अभिमान वाटतो. दिल्लीच्या अनुभवाची व्यथा मांडताना माझ्या शहरात मेट्रो का नाही, याची खंत नेहेमी असायची. महा मेट्रोने माझा अभिमान अनेक पटींनी वाढवला आहे, आज मी शहरात मेट्रोने प्रवास करत आहे, दिल्लीकरही नागपूरचे नाव घेऊ लागले आहेत आणि हे शक्य झाले आहे ते व्यवस्थापकीय संचालक डॉ. दीक्षित यांच्या कुशल व्यवस्थापनामुळे.

कार्यक्रमात नागपूर शहराचे नामवंत सायकलिस्ट डॉ. अमित समर्थ, अभियंता श्री. चैतन्य शिंगरू, कु. मधुरा बोर्डे, श्री. शंकर शिवहरे, श्री. अरुण सिंग, मिस्टर अक्रम, समाज सेवक मिस्टर विवेक गर्गे यांनी त्यांचे अनुभव सांगितले. या अतिथी वक्त्यांनी नागपूर मेट्रोच्या ७ वर्षांच्या कार्यकाळात नागरिकांना आणि मेट्रो अधिकाऱ्यांना मिळालेला प्रत्यक्ष अनुभव व्यक्त करून महामेट्रोचा अभिमान वाढवला. कार्यक्रमाचे संचालन सौ.नीलिमा हारोडे, आभार कार्यकारी संचालक (प्रशासन) श्री. अनिल कोकाटे यांनी केले.